# Regional Marathi Text Bulletin, Chhatrapati Sambhajinagar
## Date – 11 May 2024
## Time 18.10 to 18.20
## Language Marathi
## आकाशवाणी छत्रपती संभाजीनगर
## प्रादेशिक बातम्या
## दिनांक – ११ मे २०२४ सायंकाळी ६.१०

****

- लोकसभा निवडणुकीच्या चौथ्या टप्प्यातल्या प्रचारतोफा थंडावल्या-राज्यात ११ मतदार संघात परवा मतदान
- भाजप नेते पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी कोणालाही कोणताही प्रस्ताव दिलेला नाही-देवेंद्र फडणवीस यांची स्पष्टोक्ती
- मराठवाड्यात जालना, बीड आणि औरंगाबाद लोकसभा मतदार संघात मतदान प्रक्रियेसाठी प्रशासन सज्ज

आणि

- परभणीत गेल्या दोन दिवसांत उष्माघाताचे दोन बळी

****

लोकसभा निवडणुकीच्या चौथ्या टप्प्यातल्या प्रचारतोफा आज थंडावल्या. या टप्प्यात राज्यातल्या औरंगाबाद, जालना, बीड, नंदुरबार, जळगाव, रावेर, मावळ, पुणे, शिरूर, अहमदनगर आणि शिर्डी या मतदारसंघांमध्ये, परवा १३ मे रोजी मतदान होणार आहे. या निवडणुकीसाठी लागणारे साहित्य, साधन-सामुग्री मतदान केंद्रावर पुरवण्यात आलेली आहे. या अकरा मतदार संघात एकूण २९८ उमेदवार निवडणूक लढवत असून, एकूण २३ हजार २८४ मतदान केंद्रांवर, ५३ हजार ९५९ बॅलेट युनीट, २३ हजार २८४ कंट्रोल युनीट आणि २३ हजार २८४ व्हीव्हीपॅट यंत्राच्या आधारे, दोन कोटी २८ लाख १ हजार १५१ मतदार आपला मतदानाचा हक्क बजावणार आहेत.

****

महायुतीच्या बीड लोकसभा मतदार संघाच्या उमेदवार पंकजा मुंडे यांच्या प्रचारासाठी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे प्रमुख उपमुख्यमंत्री अजित पवार तसंच भाजप नेते उदयनराजे भोसले यांनी आज आष्टी इथं प्रचारसभा घेतली. बीड जिल्ह्यातल्या जनतेच्या न्याय्य हक्कांसाठी दिवंगत केंद्रीय मंत्री गोपीनाथ मुंडे यांचा वसा घेऊन पंकजा मुंडे कार्यरत असल्याचं पवार यांनी नमूद केलं.
परळी इथं पंकजा मुंडे यांची प्रचार सांगता सभा झाली. यावेळी महायुतीचे नेते महादेव जानकर, संभाजी पाटील निलंगेकर, प्रीतम मुंडे आणि धनंजय मुंडे आदी मान्यवरांनी सभेला संबोधित केलं.

****

बीड लोकसभा मतदार संघाचे महाविकास आघाडीचे उमेदवार बजरंग सोनवणे यांच्या प्रचारासाठी राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे अध्यक्ष शरद पवार यांनी आज बीड इथं प्रचार सभा घेतली. शेतकऱ्यांच्या हिताची जाणीव ठेवणाऱ्याला जनता साथ देईल, असं पवार यांनी सांगितलं. सर्व जाती धर्म-पंथांना सोबत घेऊन चालणारं सरकारच देश चालवू शकतं, असंही पवार यांनी नमूद केलं.

****

काँग्रेस नेत्या प्रियंका गांधी यांनी आज नंदुरबार इथं महाविकास आघाडीचे उमेदवार गोवाल पाडवी यांच्या प्रचारार्थ सभा घेतली. कॉंग्रेसच्या राजकारणाचा पाया महात्मा गांधीनी रचला, सत्याच्या रस्त्यावर चालण्याची त्यांनी शिकवण दिली. मात्र भाजपाकडून आदिवासींची संस्कृती बदलण्याचा प्रयत्न होत असल्याचा आरोप गांधी यांनी केला.

****

छत्रपती संभाजीनगर इथं आज सकाळपासून सर्वच राजकीय पक्षांची प्रचारासाठी लगबग सुरू आहे. महायुतीचे उमेदवार संदिपान भुमरे तसंच महाविकास आघाडीचे उमेदवार चंद्रकांत खैरे यांच्या प्रचारार्थ त्यांच्या समर्थकांनी शहरातून दुचाकी फेऱ्या काढल्या. दोन्ही बाजूंचे समर्थक क्रांती चौक इथं समोरासमोर आले असता, जोरदार घोषणाबाजीमुळे काहीकाळ तणाव निर्माण झाला होता, मात्र पोलिसांनी मध्यस्थी करून परिस्थिती पूर्वपदावर आणली. एमआयएमचे उमेदवार सय्यद इम्तियाज जलील यांनी आज फुलेनगर, एकनाथ नगर, मिलिंद नगर, नागसेन नगर आदी ठिकाणी पदयात्रा काढून जनतेशी संवाद साधला. वंचित बहुजन आघाडीचे उमेदवार अफसर खान यांनी आज बेगमपुरा इथून प्रचार रॅली काढली.

****

जालना लोकसभा मतदार संघाच्या प्रचाराच्या आजच्या शेवटच्या दिवशी उमेदवारांसह त्यांच्या प्रतिनिधींनी प्रचार फेऱ्यांसह मतदारांच्या गाठीभेटींवर भर दिला. महायुतीचे उमेदवार रावसाहेब दानवे यांच्या प्रचारार्थ आमदार संतोष दानवे यांनी भोकरदन शहरात प्रचार फेरी काढली. महाविकास आघाडीचे उमेदवार डॉ. कल्याण काळे यांनीही मतदार संघातल्या विविध गावांमध्ये प्रचार फेरी, कार्नर बैठकांच्या माध्यमातून मतदारांना आवाहन केलं.

****

भाजप नेते, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी शरद पवार तसंच उद्धव ठाकरे यांना कोणताही प्रस्ताव दिलेला नसून, माध्यमांना या विधानाचा अर्थ समजला नसल्याचं, भाजपचे नेते, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी म्हटलं आहे. ते आज पुण्यात पत्रकार परिषदेत बोलत होते. निवडणूक निकालानंतर प्रादेशिक पक्ष काँग्रेसमध्ये विलीन होतील, अशा आशयाचं विधान पवार यांनी केलं होतं, मोदी यांनी यावर बोलतांना, काँग्रेस पक्षात जाण्याऐवजी शरद पवार यांनी अजित पवार यांच्यासोबत जावं, तर उद्धव ठाकरे यांनी एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वात काम करावं, असा सल्ला मोदी यांनी दिल्याचं, फडणवीस यांनी स्पष्ट केलं. विरोधी पक्षांकडून परिपक्वतेचं दर्शन होत नसल्याचं, फडणवीस यांनी म्हटलं. काँग्रेस नेते मणीशंकर अय्यर यांच्या पाकिस्तान संदर्भातल्या विधानावर त्यांनी ही बाब नमूद केली.

****

`लोकनिर्णय महाराष्ट्राचा` या कार्यक्रमात आजच्या भागात आपण ठाणे लोकसभा मतदार संघांचा आढावा घेणार आहोत. आकाशवाणीच्या मुंबई केंद्रावरून संध्याकाळी सव्वा सात वाजता प्रसारित होणारा हा कार्यक्रम सामाजिक संपर्क माध्यमांवरूनही ऐकता येईल.

****

मराठवाड्यात जालना, बीड आणि औरंगाबाद लोकसभा मतदार संघात येत्या १३ मे रोजी मतदान होत आहे. मतदारांना मतदार यादीत आपलं नाव शोधण्यासाठी निवडणूक विभागानं आपल्या संकेतस्थळावर सुविधा उपलब्ध करून दिली आहे. त्याशिवाय मोबाईल एसएमएस सेवेद्वारेही मतदारांना ही सुविधा देण्यात आली आहे. यासाठी मतदारांनी मोबाईलच्या मेसेज बॉक्समध्ये इंग्रजीत ईसीआय स्पेस आणि त्यानंतर आपला मतदार ओळखपत्राचा क्रमांक लिहून १९५० या क्रमांकावर मेसेज

पाठवायचा आहे. त्यांना तत्काळ मेसेजद्वारे मतदार यादी क्रमांक आणि मतदार क्रमांक पाठवण्यात येत आहे.

****

परवाच्या मतदान प्रक्रियेसाठी छत्रपती संभाजीनगर जिल्हा प्रशासन सज्ज झालं आहे. जिल्ह्यात प्रत्येक मतदान केंद्रावर पाळणाघराची सुविधा तसंच दिव्यांग मतदारांसाठी व्हिलचेअर्स उपलब्ध असणार आहेत. याशिवाय मतदानाच्या दिवशी मतदान प्रक्रियेदरम्यान मतदार आणि कर्मचारी यांच्यासाठी एकूण दोन हजार तीनशे चौऱ्याहत्तर आरोग्य कर्मचाऱ्यांची नियुक्ती करण्यात आली आहे. या व्यतिरिक्त प्रत्येक प्राथमिक आरोग्य केंद्राच्या ठिकाणी उष्माघात कक्ष स्थापन करण्यात आले असून तिथे २४ तास वैद्यकीय अधिकारी आणि आवश्यक कर्मचारी उपस्थित राहणार आहेत.

****

जालना इथं अतिरिक्त मुख्य निवडणूक अधिकारी डॉ. किरण कुलकर्णी यांनी आज जिल्हाधिकारी कार्यालयातील निवडणुकीशी संबंधित विविध कक्षांना भेट दिली. तसंच औद्योगिक वसाहतीमधल्या मतमोजणी केंद्रासह स्ट्रॉंगरुमची पाहणी केली. आणि संबंधित अधिकाऱ्यांना आवश्यक सूचना केल्या. जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी श्रीकृष्ण पांचाळ, पोलीस अधीक्षक अजयकुमार बन्सल, जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी वर्षा मीना यांच्यासह अनेक अधिकारी-कर्मचारी यावेळी उपस्थित होते.

****

बीड शहरातील चंपावती विद्यालयातल्या मतदान केंद्राची आज जिल्हा निवडणूक अधिकारी दिपा मुधोळ मुंडे, यांनी पाहणी केली. महिला मतदारांच्या अर्भकांसाठी पाळणाघर, विश्रांती कक्ष आदी सुविधांचा त्यांनी आढावा घेतला. या लोकसभा मतदारसंघात एकूण दोन हजार ३५५ मतदान केंद्रावरील मतदान केंद्राध्यक्ष आणि त्यांचे तीन सहकारी तसंच राखीव अधिकारी कर्मचारी, अशा सुमारे साडे दहा हजार अधिकारी कर्मचाऱ्यांची सरमिसळ प्रक्रियेद्वारे आज निवड झाली. या सर्व पथकांना उद्या रविवार दिनांक १२ मे रोजी सहा विधानसभा मतदार संघातील निश्चित मतदान केंद्रांवर रवाना व्हायचं आहे.

****

परभणी जिल्ह्यात उन्हाची तीव्रता वाढलेली असून पारा सातत्याने ४० अंशाच्या वर राहत आहे. वाढत्या उष्णतेमुळे जिल्ह्यात एका आठवड्यात उष्माघातामुळे दोन बळी गेले आहेत. पूर्णा तालुक्यातल्या कातनेश्वर इथले ५५ वर्षीय भानुदास चापके यांचा आज दुपारी उष्माघाताने मृत्यू झाला. तर देवगाव दुधाटे इथल्या कचरुबा गुंडाळे यांचा दोन दिवसांपूर्वी मृत्यू झाला.

****

सोलापूर जिल्ह्यात सांगोला जत मार्गावर सोनंद गावाजवळ आज चारचाकीचा अपघात झाल्याने तीन महिला ठार झाल्या तर तीन महिला गंभीर जखमी झाल्या. मजूर महिलांना घेऊन ही चारचाकी पंढरपूर तालुक्यातील पाचेगाव इथं द्राक्ष बागेत काम करण्यासाठी जात होती. भरधाव असलेल्या या चारचाकीचा टायर फुटल्याने ही दुर्घटना घडल्याचं, आमच्या वार्ताहरानं कळवलं आहे.

****

बुलढाणा जिल्ह्यातल्या जळगाव जामोद तालुक्यातल्या भेंडवळची राज्यभर प्रसिद्ध असलेल्या पीक पाण्याचा अंदाज वर्तवणारी घटमांडणी आज जाहीर झाली. रामदास महाराज वाघ यांनी सकाळी ही घटमांडणी जाहीर केली, यंदा राज्यात पिकपाणी आणि पाऊस चांगला राहील, असं अंदाज वर्तवला आहे. राज्यभरातील अनेक शेतकरी या भेंडवळच्या घट मांडणीवर विश्वास ठेवून आपापल्या शेतात पेरणी करत असतात, अशी माहिती आमच्या वार्ताहरानं दिली आहे.

****

नांदेड जिल्ह्यात काल अक्षय्य तृतीयेच्या मुहूर्तावर दोन बालविवाह रोखण्यास प्रशासनाला यश आलं. बालविवाह होणार असल्याची गोपनीय माहिती जिल्हा बाल संरक्षण कक्षास प्राप्त झाल्यानंतर संबंधित पथकाने हे विवाह थांबवून पालकांचं समुपदेशन केलं.

****

बीड जिल्ह्यातल्या अंबाजोगाई शहरासह काही भागात आज विजांच्या कडकडाटासह अवकाळी पावसाने जोरदार हजेरी लावली. मागील तीन चार दिवसांपासून उकड्यापासून हैराण झालेल्या नागरिकांना या पावसामुळे दिलासा मिळाला आहे.

सांगली जिल्ह्यातल्या मिरज शहरासहीत ग्रामीण भागातही आज वादळी पाऊस झाला.

✻✻✻✻